ठिकाणीही शिवपुरी आश्रमाचे अनुयायी वैदिक जीवनपध्दतीचा अंगीकार करून हे कार्य करीत आहेत. अग्निहोत्रामुळे होणाऱ्या सुखी, समृध्दी जीवनाचा लाभ आज जगभरातील असंख्य शिवपुरीचे अनुयायी घेत आहेत. दिल्ली, राहूरी, लखनौ, दापोली इ. विद्यापीठांच्या अद्ययावत प्रयोगशाळांमध्ये अग्निहोत्र या विषयावर संशोधन होत आहे.

अशा या वैश्विक कार्य असलेल्या अग्निहोत्राच्या उगमस्थानी शिवपुरी मध्ये बरेच समाजोपयोगी प्रकल्प राबिवले जातात. यामध्ये यात्रेकरुंसाठी अन्नदान, निवासाची उत्तम सोय, इंग्रजी माध्यमाचे शिक्षण संस्कृत पाठ वर्ग, योगासने प्रशिक्षण व अभ्यास तळागाळातील लोकांसाठी आयुर्वेदिक चिकित्सा शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत नेत्र चिकित्सा व सुसज्ज असे पंचकर्म केंद्र.

वैदिक जीवनपध्दती, अग्निहोत्र उपासना शिकण्याकरिता व आयुर्वेदिक पंचकर्म उपचाराकरिता आज देश विदेशातून लोक शिवपुरी येथे वास्तव्यास येतात. अत्यंत निसर्गरम्य परिसर लाभलेला या शिवपुरी आश्रमामध्ये अत्यंत दुर्मिळ वृक्ष, आयुर्वेदिक वनस्पती व नक्षत्र उद्यान यांचे संगोपन करण्यात आलेले आहे.

परमसद्‌गुरू श्री गजानन महाराजांच्या महानिर्वाणानंतर सन १९८७ साली या कार्याची धुरा श्री श्रीकांतजी महाराजांनी समर्थपणे सांभाळली व या कार्यास नवी दिशा दिली. श्री श्रीकांतजी महाराजांच्या महानिवार्णानंतर त्यांचे पुत्र डॉ. पुरूषोत्तम राजीमवाले हे आता गुरूमंदिर, शिवपुरी आश्रम, अग्निहोत्र प्रचार प्रसार संशोधन, आयूर्वेद प्रचार प्रसार, वैदिक जीवन पध्दती शिकवण या कार्यासाठी पुर्ण वेळ परिश्रम घेत आहेत. गुरू मंदिर, शिवपुरी आश्रमाच्या विकासाकरीता व उन्नतीकरीता डॉ. पुरूषोत्तम राजीमवाले यांच्या मातोश्री श्रीमती मालावहिनी आणि पत्नी डॉ. सौ. गिरीजा राजीमवाले यांची प्रेरणा सातत्याने कार्यशील आहे.

**- जितेंद्रकुमार जाजू**

**संपर्क : ९४२२५८३९००**

**नित्य करा हो नामस्मरण, सुखी होईल जीवन.**